छाननी व तालिनीकरण कक्ष
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
दुरध्वनी क्र.२०२५६२१४१६

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

*(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)*

## Savitribai Phule Pune University

*(Formerly University of Pune)*

Scrutiny & Tabulation Section
Ganeshkhind,Pune-411007
Phone: 2025621416
E-mail: dyrst@pun.unipune.ac.in
Website:www.unipune.ac.in.

संदर्भ : परीक्षा/विधी / 2066 दिनांक : २७.०५.२०२३ 28

प्रति
मा.प्राचार्य
सर्व संलग्नित विधी महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

**विषय – तृतीय वर्ष एल.एल.बी.(१७) व पंचम वर्ष बी.ए.एल.एल.बी.(१७) अंतीम वर्ष परीक्षांच्या प्रात्यक्षिक परीक्षेबाबत...**

महोदय/महोदया,

वरील विषयास अनुसरुन तृतीय वर्ष एल.एल. बी. व पाच वर्ष बी.ए.एल.एल.बी अभ्यासक्रमाच्या तृतीय ते पंचम वर्ष बी.ए.एल.एल.बी च्या लेखी परीक्षा दिनांक १५ जून, २०२३ पासून सुरु होत असून २७ जून, २०२३ रोजी संपुष्टात येत आहेत.

लेखी परीक्षेपूर्वी तृतीय वर्ष एल.एल.बी.(१७) व पंचम वर्ष बी.ए.एल.एल.बी.(१७) अंतिम वर्षाच्या प्रात्यक्षिक परीक्षा दिनांक ०३ जून,२०२३ ते ०९ जून,२०२३ पासून घेण्याचे प्रस्तावित आहे. प्रात्यक्षिक परीक्षांचे गुण ऑनलाईन पध्दतीने नोंदविण्यासाठी दिनांक ०३ जून, २०२३ ते १२ जून,२०२३ हा कालावधी देण्यात आलेला आहे.

याबाबत आपणास परीक्षा समन्वय कक्षाकडून ऑनलाईन पध्दतीने मा.प्राचार्य, मा.चेअरमन व मा. बहि:स्थ परीक्षक यांना नेमणूक पत्र पाठविण्यात येणार आहेत.

मा.प्राचार्य/मा.चेअरमन यांना विनंती करण्यात येते की, मा.चेअरमन व बहि:स्थ परीक्षक यांचेशी समन्वय साधून उपरोक्त कालावधीत योग्य ती तारीख व वेळ घेवून प्रात्यक्षिक परीक्षांचे आयोजन महाविद्यालय स्तरावर सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार करुन विद्यार्थ्यांना याबाबत सूचित करण्यात यावे ही विनंती.

कळावे,

आपला,

उपकुलसचिव
परीक्षा छाननी व तालिनीकरण कक्ष

सोबत – वरीलप्रमाणे